# आरोग्य विभाग परीक्षा 28 फेब्रुवारी 2021–चालू घडामोडी

विद्यार्थी मित्रांनो 28 फेब्रुवारी 2021 रोजी आरोग्य विभागाची वेगवेगवळ्या पदांकरिताची परीक्षा आहे. या परीक्षेत चालू घडामोडी 5 ते 6 मार्कांसाठी विचारल्या जातात. सदर परीक्षेत वन लाईन स्वरुपातील प्रश्न असतात. तसेच चालू घडामोडी या G.K. टाईप विचारलेल्या असतात. यापूर्वी आरोग्य विभागाच्या परीक्षेत विचारलेले प्रश्न खालीलप्रमाणे आहेत.

**टीप :** या नोटस् कोणीही कोणत्याही चॅनेल किंवा ग्रुपवर शेयर करु शकता.

– देवा जाधवर : 9359558186

## आरोग्य विभाग – चालू घडामोडी वर आलेले प्रश्न

**1) प्रधानमंत्री मातृवंदना योजना कोणासाठी आहे ?**

**1) गरोदर महिला** 2) परराज्य विवाह

3) मुलींसाठी 4) यापैकी कोणतेही नाही

---

**2) आयुष्यमान भारत या योजनेमध्ये लाभार्थीला किती रुपयापर्यंत लाभ मिळतो?**

1) 3 लाख 2) 4 लाख

**3) 5 लाख** 4) 6 लाख

---

**3) भारतात हरीत क्रांती कोणी आणली ?**

1) डॉ. नार्मन बोर्लोग बोरलॉज **2) डॉ. एम.एस. स्वामीनाथन**

3) डॉ. बोरीस 4) वर्गीस कुरीयन

---

**4) श्वेत क्रांती म्हणजे काय ?**

**1) दूध क्रांती** 2) मत्स्य क्रांती

3) खत क्रांती 4) यापैकी एकही नाही

---

**5) जननी सुरक्षा योजना बाबत खालील कोणते विधान चुकीचे आहे ?**

**1) मातेला मोफत संदर्भ दिली जाते.**

2) योजनेचा उद्देश संस्थात्मक प्रसुती वाढविणे.

3) बालक मृत्युदर कमी करणे.

4) सदर योजनेला 100% केंद्रातून सहाय्य मिळते.

---

**6) एच.आय.व्ही बाबत पुढीलपैकी कोणती चाचणी निर्णायक स्वरूपाची मानली जाते ?**

1) एलायझा

2) हार्मोन्स टेस्ट

**3) वेस्टर्न ब्लॉक**

4) इम्युनोॲसे टेस्ट

---

**7) प्रधानमंत्री मातृवंदना योजनेमध्ये पात्र लाभार्थ्यांना कोणता आर्थिक लाभ दिला जातो ?**

1) रु. 5000/- एवढी रक्कम रोख स्वरुपात

2) रु. 5000/- एवढी रक्कम चेक स्वरुपात

**3) रु. 5000/- एवढी रक्कम तीन हप्त्यात आधार संलग्न बँक/पोस्ट खात्यात**

4) रु. 5000/- एवढी रक्कम दोन हप्त्यात आधार संलग्न बँक/पोस्ट खात्यात

---

**8) एच.आय.व्ही. (HIV ) म्हणजे काय ?**

**1) ह्युमन इम्युनो डेफिशियन्सी व्हायरस**

2) ह्युमन इम्युनो डिसीज व्हायरस

3) हेरिडेटरी इम्युनो डेफिशियन्सी व्हायरस

4) यापैकी नाही

---

**9) जागतिक आरोग्य दिन कोणत्या तारीखेस साजरा केला जातो ?**

1) 11 जुलै

2) 10 एप्रिल

**3) 7 एप्रिल**

4) 7 मार्च

**10) राष्ट्रीय एड्स संशोधन संस्थेचे मुख्यालय कुठे आहे ?**

1) कोलकत्ता　　2) मुंबई

3) बंगळुर　　**4) पुणे**

---

**11) लोक बिरादरी हा प्रकल्प डॉ. प्रकाश आमटे व मंदाकिनी आमटे यांनी गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड तालुक्यात ............. येथे उभारलेला आहे.**

1) कसनपुर　　2) आलापल्ली

**3) हेमलकसा**　　4) झिंगानुर

---

**12) जागतिक सिकलसेल दिवस या तारखेला साजरा केला जातो ?**

**1) 19 जून**　　2) 11 जुलै

3) 1 डिसेंबर　　4) 5 ऑगस्ट

---

**13) 29 फेब्रुवारी हा दिवस शासनाकडून महिला आरोग्य दिन म्हणून पाळला जातो. कोणाच्या स्मरणार्थ हा दिन साजरा केला जातो ?**

**1) डॉ. आनंदीबाई जोशी**　　2) कुसुमताई आमटे

3) आनंदीबाई कर्वे　　4) रमाबाई रानडे

---

**14) 'मिशन इंद्रधनुष्य' खालीलपैकी कशाशी संबंधित आहे ?**

**1) लसीकरण**　　2) जलसंवर्धन

3) कृत्रिम पाऊस　　4) जलसिंचन

---

**15) जननीसुरक्षा योजने अंतर्गत ग्रामीण भागासाठी गरोदर मातेची प्रसुती आरोग्य संस्थेत झाल्यास मातेला किती रुपये लाभ दिला जातो ?**

1) 500　　2) 600

**3) 700**　　4) 800

---

**16) जागतिक क्षयरोग नियंत्रण दिवस या तारखेला साजरा केला जातो ?**

**1) 24 मार्च** 2) 11 जुलै
3) 1 डिसेंबर 4) 5 ऑगस्ट

---

**17) जननी सुरक्षा योजनेची सुरुवात ............... साली झाली होती.**

1) 2009 **2) 2005**
3) 2003 4) 2001

---

**18) आहार सप्ताह ............. महिन्यात साजरा केला जातो.**

1) नोव्हेंबर **2) सप्टेंबर**
3) जानेवारी 4) ऑक्टोबर

---

**19) ............. हा दिवस जागतिक लोकसंख्या दिन म्हणून साजरा केला जातो.**

1) 10 मार्च **2) 11 जुलै**
3) 10 जुलै 4) 11 फेब्रुवारी

---

**20) आयुष शब्दात खालीलपैकी कोणत्या वैद्यक शास्त्राचा समावेश आहे ?**

1) आयुर्वेद 2) युनानी
3) सिद्ध **4) वरीलपैकी सर्व**

---

**21) सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमाचे (RNTCP ) नवीन नाव काय ?**

**1)** NTEP 2) NTCPI
3) NTCP 4) RNTCPI

---

**22) भारताची पहिली महिला डॉक्टर कोण ?**

1) ईरावती कर्वे **2) डॉ. आनंदीबाई जोशी**
3) डॉ. आनंदीबाई देशपांडे 4) डॉ. आनंदीबाई पटवर्धन

# आरोग्य विभाग – चालू घडामोडी

**2021–22 च्या अर्थसंकल्पात आरोग्य विभाग :**

कोरोना संकटामुळे आरोग्य क्षेत्रातील उणिवा प्रकर्षाने दिसून आल्या. त्यामुळे आरोग्य क्षेत्र मजबूत करण्यासाठी केंद्र सरकारने आरोग्य क्षेत्राला बूस्टर डोस देऊन मोठा दिलासा दिला आहे. या अर्थसंकल्पात आरोग्यसेवा क्षेत्रासाठी 2.23 लाख कोटींची भरीव तरतूद करण्यात आली आहे. गेल्यावर्षीच्या तुलनेत यंदा आरोग्य सुविधांसाठी 137 टक्क्यांनी तरतूद वाढविली असल्याचे अर्थमंत्री निर्मला सितारामन यांनी सांगितले. सीतारामन म्हणाल्या, सरकार या वर्षीपासून पुढील सहा वर्षांपर्यंत आरोग्यसेवांसाठी 64,180 कोटी रुपये खर्च करणार आहे. आरोग्यसेवा सुधारण्यासाठी सरकारने तीन स्तरांची पुढील सहा वर्षांची योजना तयार केली आहे. आरोग्यसेवा योजनेंतर्गत देशातील ग्रामीण भागात 17,000, शहरी आणि निमशहरी भागात 11,000 नवीन आरोग्यसेवा केंद्रे उभारली जाणार आहेत. यामध्ये नवीन येणाऱ्या आजारांवर लक्ष ठेवले जाणार असून, योग्य त्या प्रतिबंधात्मक उपाययोजनाही केल्या जातील. प्रत्येक जिल्ह्यात अत्याधुनिक लॅब उभारण्यात येणार असून, 75 हजार आरोग्यसेवा केंद्रे व लॅब यांना एकमेकांशी जोडले जाणार आहे. कोरोना लसीसाठी 35 हजार कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

---

**कोरोना विषाणूचा कहर :**

कोरोना जातीच्या नव्या विषाणूने जगात धुमाकूळ घातला. जगभरातील लाखो लोकांचे बळी या विषाणूने घेतले आहेत. या विषाणूचा उगम 31 डिसेंबर 2019 रोजी चीनच्या हुबेइ प्रांतातील वुहान शहरात आढळला. या विषाणूला Novel Corona, nCov, वुहान व्हायरस, COVID-19 या नावाने देखील ओळखले जाते. जागतिक आरोग्य संघटनेने कोरोना विषाणूला COVID-19 असेअधिकृत नाव दिले आहे. C-Corona, VI-Virus, D-disease, 19-2019 30 जानेवारी 2020 रोजी जागतिक आरोग्य संघटनेने कोरोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर जागतिक आणीबाणी घोषित केली. कोरोना हा लॅटिन भाषेतील शब्द असून त्याचा अर्थ 'मुकूट' असा आहे. WHO ने जाहीर केलेल्या आत्तापर्यंतच्या जागतिक आरोग्य आणीबाणी पुढीलप्रमाणे :

1) 2007 – सार्स
2) 2009 – स्वाईन फ्ल्यू
3) 2014 – पोलिओ
4) 2014 – इबोला
5) 2016 – झिका
6) 2019 – इबोला
7) 2020 – कोरोना

- भारतात कोरोनाचा पहिला रुग्ण केरळात आढळला.
- भारतातील केरळ राज्याने सर्वप्रथम कोरोना विषाणूला 'राज्य आपत्ती' म्हणून जाहीर केले.
- लखनौमधील 'द किंग जॉर्ज विद्यापीठ' हे कोरोनावरील उपचारासाठी प्लाझ्मा थेरपीचा वापर करणारे भारतातील पहिले शासकीय रुग्णालय ठरले.
- भारत सरकारने 15 मार्च 2020 रोजी COVID-19 ला अधिसूचित आपत्ती म्हणून जाहीर केले.
- कोरोना संशयित रुग्णांच्या घशातील किंवा नाकातील द्रव्याची (स्वॅब) तपासणी करण्यासाठी पुण्याच्या 'सेंटर फॉर मटेरियल्स फॉर इलेक्ट्रॉनिक्स टेक्नॉलॉजी'ने (सी–मॅट) देशातील पहिला स्वदेशी बनावटीचा 'पॉलिमर रॉड' अवघ्या आठ दिवसांत तयार केला.
- COVID-19 च्या संशोधन व विकासाबाबत जलद निर्णय घेण्यासाठी भारत सरकारने 4 एप्रिल 2020 रोजी एक विज्ञान आणि तंत्रज्ञान सशक्त समिती विनोद पॉल आणि के. विजय राघवन यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आली.
- 11 मार्च 2020 रोजी जागतिक आरोग्य संघटनेने कोरोना विषाणूला 'जागतिक महामारी' म्हणून घोषित केले, कारण जगात सर्वच देशांत वेगाने हा विषाणू पसरत आहे. द युनायटेड स्टेट्स सेंटर फॉर डिसीज कंट्रोल अँड प्रिव्हेंशनने जागतिक महामारी व्याख्या अशी केली की – जगातील बहुतांश देशांमध्ये मोठ्या प्रमाणात पसरुन असंख्य लोकांवर परिणाम करणारा सार्वदेशिक रोग म्हणजे महामारी होय.

**COVID-19 भारतात लागू करण्यात आलेली टाळेबंदी (Lockdown) :**

1) टप्पा – I – 25 मार्च ते 14 एप्रिल 2020 (21 दिवस)
2) टप्पा – II – 15 एप्रिल ते 3 मे 2020 (19 दिवस)
3) टप्पा – III – 4 मे ते 17 मे 2020 (14 दिवस)
4) टप्पा – IV – 18 मे ते 31 मे 2020 (14 दिवस)
5) टप्पा – V – 1 ते 30 जून 2020 (फक्त प्रतिबंधित क्षेत्र)
6) टप्पा – VI – 1 ते 31 जुलै 2020 (फक्त प्रतिबंधित क्षेत्र)

**क्वारेंटाइन म्हणजे :**

- ते निरोगी व्यक्तीला वेगळे ठेवण्यासाठी आहे, ज्याचे संक्रमण होण्याची शक्यता आहे.
- प्रभावित देशातून आला असेल/संक्रमित व्यक्तीच्या संपर्कात असेल त्याला क्वारेंटाइनमध्ये ठेवतात.
- हे 14 दिवसांसाठी असते, कारण व्यक्ती आजारी आहे की नाही 14 दिवसांत स्पष्ट होते.
- त्यात व्यक्ती कुटुंबासोबत, घरात वेगळ्या खोलीत सावधगिरी बाळगून राहू शकते.

**आयासोलेशन म्हणजे :**

- ज्यांच्यात लक्षणे दिसत आहेत किंवा ज्याची टेस्ट पॉझिटिव्ह आली आहेत अशा लोकांसाठी.
- ज्यांची लक्षणे स्पष्ट असतात आणि ती आजारी आहे हे निश्चित होते अशा व्यक्तीला आयसोलेशनमध्ये वेगळे ठेवले जाते.
- व्यक्ती पूर्णपणे बरे होत नाही आणि दुसरे लक्षण दिसत नाही तोपर्यंत हे चालते.
- यात आजारी व्यक्तीला एकाकी राहावे लागते. डॉक्टरांच्या निगराणीतही राहवे लागते.

**कोरोना विषाणूचे वैज्ञानिक नाव –** ‘सार्स सीओव्ही-2’

Severe acute respiratory syndrome coronavirus-2 (SARS-Cov2)

- महाराष्ट्रात 16 मार्च 2020 पासून सर्व संस्था, शॉपिंग मॉल, सिनेमागृहे, जिम अशी ठिकाणे 31 मार्चपर्यंत बंद करण्याचा निर्णय घेतला होता.
- N-95 मास्क म्हणजे – Non Oil Based Usesआणि 95 म्हणजे 95% गाळण

क्षमता होय.

**कोविड-19 च्या प्रतिबंधात्मक नियोजनासाठी निश्चित केलेले कलर कोड :**

1) रेड झोन - सर्वाधिक रुग्ण असणारा भाग

2) ऑरेंज झोन - रेड आणि ग्रीन झोनमधील भाग

3) ग्रीन झोन - एकही रुग्ण नसणारा भाग

**आरोग्य सेतू ॲप :**

कोविड-19 विरुद्ध लढा देण्यासाठी शासनाने एक मोबाईल ॲप सुरु केले. यामुळे कोविडच्या रुग्णापासून धोका असल्यास त्यासंबंधी आपल्या मोबाईलवर सोकेस्टिकेटेड पॅरामीटर मिळतात. हे ॲप वापरकर्त्याची माहिती त्यात असल्यामुळे शासनाला विलगीकरण वगैरे उपाययोजना राबवताना या ॲपची मदत होते. तुमच्या संपर्कात आलेली व्यक्ती काही दिवसांनी कोरोना पॉझिटिव्ह निघाली तरी हे ॲप तुम्हाला संभाव्य धोका सूचित करते.

**साथरोग नियंत्रण अधिनियम 1897 :**

साथरोग प्रतिबंधात्मक कायदा हा स्वातंत्र्यपूर्व ब्रिटिश सरकारने बनवलेला आहे. मुंबई प्रांतातील प्लेगची साथ आटोक्यात आणण्यासाठी तयार करण्यात आलेला कायदा. महाराष्ट्रात 14 मार्च 2020 पासून हा अधिनियम लागू करण्यात आला. या अधिनियमाच्या खंड 2, 3 व 4 नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार राज्य सरकारने कोरोना विषाणुमुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रणासाठी नियम केले आहेत.

- टाळेबंदीच्या काळात परदेशात अडकलेले भारतीय नागरिक भारतात आणण्यासाठी वंदे भारत मिशन (हवाई मार्ग) राबविण्यात आले तसेच ऑपरेशन समुद्र सेतू (समुद्र मार्ग) राबविण्यात आले.
- अनलॉक - 1 टप्पा : 1 जून ते 30 जून
- अनलॉक - 2 टप्पा : 1 जुलै ते 31 जुलै
- WHO - जागतिक आरोग्य संघटना
  - स्थापना : 7 एप्रिल 1948
  - मुख्यालय : जीनिव्हा
  - विद्यमान अध्यक्ष : Dr. Tedros Adhanom (Ethiopia)
  - उपमहासचिव : सौम्या स्वामीनाथन

- सदस्य राष्ट्र : 194 – विभागीय कार्यालय : एकूण सहा
- सहयोगी देश : एकूण दोन (1 टोकेला, 2 पोर्टोरिको)

- न्यूझीलंडने कोरोना संकटावर मात करत देशातले व्यवहार पूर्वीप्रमाणेच सुरु केले आहेत. न्यूझीलंड हा देश 9 जून 2020 रोजी कोरोना विषाणूमुक्त झाला. कोरोनामुक्त झालेला पहिला देश न्यूझीलंड.
- देशात कोरोना विषाणूच्या झालेल्या उद्रेकाच्या पार्श्वभूमीवर बनावट हँड सॅनिटायझर उत्पादने बाजारात येत आहेत. ही बाब लक्षात घेऊन हिमाचल प्रदेश राज्यातील पालमपूर स्थित सी.एस.आर. हिमालयन बायोसोर्स टेक्नॉलॉजी या संस्थेने रसायनमुक्त हँड सॅनिटायझरची निर्मिती केली आहे.
- विविध राज्यातील कामगारांना त्यांच्या राज्यात, घरी जाता यावा यासाठी गृह मंत्रालयाच्या निर्देशांनुसार श्रमिक स्पेशल ट्रेन्सची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली.
- जगातील सर्वात मोठे दहा हजार खाटांचे कोविड सेंटर दिल्लीत सुरु करण्यात आले. राधास्वामी सत्संग व्यास परिसरात दहा हजार खाटांच्या कोविड सेंटरचे दिल्लीचे नायब राज्यपाल अनिल बैजल यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.
- रेल्वे गाडीतच विशेष COVID-19 रुग्णालय उभारण्यात आलेली जगातील पहिली COVID स्पेशल ट्रेन भारतातील दिल्ली शहरात उभारण्यात आली.

◆ ICMR :
  - Indian Council of Medical Research
  - स्थापना : 1911
  - मुख्यालय – नवी दिल्ली
  - सध्याचे महासंचालक डॉ. बलराम भार्गव
  - आरोग्यविषयक विषयावर संशोधन करण्यासाठी ICMR च्या 26 राष्ट्रीय संस्था आहेत.
  - 1911 मध्ये भारतीय संशोधन निधी संघटना (IRFA ) या नावाने स्थापना, 1949 मध्ये ICMR असे नामकरण.

◆ महाराष्ट्रात कोरोनाचा पहिला रुग्ण पुणे शहरात आढळला.

◆ आपल्या लोकांना मोफत आणि कॅशलेस विमा संरक्षण देणारे देशातील पहिले

राज्य - महाराष्ट्र.

- एअरटेल पेमेंटस् बँकेने कोविड-19 विमा पॉलिसी सुविधा सुरु केली आहे.
- कोरोना विषाणूचा पाठलाग करायचा या उद्देशाने महाराष्ट्र राज्याने 'चेस दि व्हायरस' ही शोधमोहिम राबविली आहे.
- कोरोना महामारीच्या काळात अर्थसंकल्प अधिवेशन सुरु करणारे पहिले राज्य आंध्रप्रदेश आहे.
- Covid-19च्या लसीबाबत Human Trials पूर्ण करणारा रशिया हा जगातील पहिला देश आहे.
- कोविड-19 साठीच्या योजना/अॅप :

  - कोरोना कवच
  - ऑपरेशन शिल्ड
  - I GOT
  - आरोग्य सेतू
  - 5T प्लान

  } भारत सरकार

  - समाधान अॅप - HRD मिनिस्ट्री
  - ऑपरेशन नमस्ते - इंडियन आर्मी
- चर्चेतील औषधे कोरोना संदर्भात :

| | |
|---|---|
| - COVAXIN | - हायड्रोक्सीक्लोरोक्वीन |
| - रेमडेसिव्हिर | - युमीफेनोवीर |
| - Fabiflu | - Covifor |
| - डेक्सामेथाझोन | - कोरोनिल टॅबलेट (पतंजली) |

- कोरोना संदर्भात महाराष्ट्र सरकारने स्थापन केलेल्या टास्क फोर्सचे प्रमुख- डॉ. संजय ओक

---

**2020 हे वर्षे आंतरराष्ट्रीय नर्स आणि दाईंचे वर्षे :**

जगातील पहिल्या परिचारिका फ्लोरेन्स नाईटिंगेल यांच्या सन्मानार्थ 12 मे हा दिवस जागतिक परिचारिका दिन म्हणून साजरा केला जातो. 12 मे 1820 रोजी नाईटिंगेल यांचा

जन्म इटली येथे झाला. या घटनेला 2020 मध्ये 200 वर्षे पूर्ण झाली. त्यांच्या 200 व्या जयंतीनिमित्ताने जागतिक आरोग्य संघटनेने (WHO ) 2020 हे वर्ष Year of Nurse & Miduife म्हणून साजरा करत आहे. यासोबत WHO 'वर्ल्ड नर्सिंग रिपोर्ट' विकसित करणार आहे, या प्रकारचा हा पहिलाच अहवाल असणार आहे. 1853 मध्ये क्रिमियन युद्धाच्या काळात त्यांना तुर्कस्तानच्या लष्करी रुग्णालयात पाठवण्यात आले. एखाद्या महिलेस ब्रिटनकडून लष्करात संधी देण्याची ही पहिलीच वेळ होती. रुग्णालयात रात्रपाळीत त्या हातात मशाल घेऊन रुग्णांची सेवा करत असत. यामुळे त्या 'लेडी विथ लॅम्प' म्हणून प्रसिद्ध झाल्या. आजही त्यांच्या सन्मानार्थ नर्सिंगची शपथ हातात लॅम्प देऊन केली जाते. त्यांचा मृत्यु 13 ऑगस्ट 1910 रोजी लंडन येथे झाला. त्या आधुनिक रुग्ण परिचर्या शास्त्राच्या संस्थापिका होत्या. तसेच त्यांनी समाज सुधारणेसाठी संख्याशास्त्राचा वापर करण्याचे विशेष कार्य केले. संख्याशास्त्राची कुठलीही पदवी नसताना 1859 ला त्या रॉयल स्टॅटिस्टिकल सोसायटीच्या पहिल्या महिला सदस्य म्हणून निवडून आल्या. त्या अमेरिकन स्टॅटिस्टिकल असोसिएशनच्या मानद सदस्यही होत्या. 1883 मध्ये राणी व्हिक्टोरियाने त्यांना रॉयल रेड क्रॉस प्रदान करुन त्यांचा सन्मान केला. 1907 मध्ये त्यांना ब्रिटिश सरकारकडून ऑर्डर ऑफ मेरिट किताब मिळाला, तो किताब मिळणाऱ्या त्या पहिल्याच महिला होत्या.

**त्यांची पुस्तके :** 1) नोट्स ऑन नर्सिंग 2) नोट्स ऑन मेटर्स अॅफेक्टिंग द हेल्थ 3) एफिशियन्सी अँड हॉस्पिटल अॅडमिनिस्ट्रेशन ऑफ द ब्रिटिश आर्मी

---

WHO **कार्यकारी मंडळाच्या अध्यक्षपदी – डॉ. हर्षवर्धन :**

केंद्रीय आरोग्यमंत्री डॉ. हर्षवर्धन ओमप्रकाश गोयल यांची 22 मे 2020 रोजी जागतिक आरोग्य संघटनेच्या कार्यकारी मंडळाच्या अध्यक्षपदी निवड झाली. या पदाचा कार्यकाळ एक वर्षाचा आहे. हर्षवर्धन यांनी जपानचे डॉ. हिरोकी नाकातानी यांच्याकडून या पदाचा कार्यभार स्विकारला. कार्यकारी मंडळात 34 देशांचा समावेश असतो आणि धोरणांचे सुकाणू हे मंडळ सांभाळते. कोविड-19 मुळे या संघटनेत जणू बेदली माजली असताना हे पद डॉ. हर्षवर्धन यांना मिळावे हे उत्तमच. दिल्लीत कान-नाक-घसा तज्ज्ञ म्हणून बस्तान बसून पाहणारे हर्षवर्धन 'इंडियन मेडिकल असोसिएशन'च्या कार्यात उतरले. भाजपची 'डॉक्टर विंग' स्थापण्यात त्यांचा पुढाकार होता. 1998 मध्ये WHO तर्फे प्रतिष्ठेचे 'महासंचालक

पदक' देखील मिळाले होते. WHO च्या 147 व्या बैठकीत हर्षवर्धन यांची निवड झाली. पोलिओ निर्मूलनासाठीचा 'रोटरी'चा पुरस्कार (2001) देताना अटलबिहारी वाजपेयींनी त्याचा उल्लेख 'स्वास्थ्यवर्धन' असा केला होता. 2002 मध्ये Doctor of the last Decade by Indian Medical Association's News Delhi Branch पुरस्कार मिळाला. 1993 ते 2014 दिल्ली विधानसभेचे सदस्य, सलग पाच वेळा दिल्ली विधानसभेचे सदस्य म्हणून निवडून आले. मे-2014 मध्ये चाँदणी चौक (दिल्ली) मतदार संघातून लोकसभेचे खासदार म्हणून निवडून आले.

---------------------------------------------------

**राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाची स्थापना :**

राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाची स्थापना प्रामुख्याने वैद्यकीय शिक्षण क्षेत्रात सुधारणा करण्यासाठी उचलेले एक पाऊल आहे. ही संस्था आता वैद्यकीय क्षेत्रातील शिखर संस्था असेल.

- ◆ अधिसूचना जारी : 24 सप्टेंबर 2020
- ◆ आयोग कार्यरत : 25 सप्टेंबर 2020
- ◆ राष्ट्रीय वैद्यकीय आयोग कायदा पारित : 8 ऑगस्ट 2019
- ◆ पूर्वीचा कायदा - भारतीय वैद्यकीय परिषद कायदा 1956 (आता संपुष्टात)

NMC (National Medical Commission) **रचना :**

या आयोगात 33 सदस्य असतील, दहा पदसिद्ध सदस्य, देशातील आरोग्य विद्यापीठातील कुलगुरुमधून दहा सदस्य नामनिर्देशित असतील, राज्य वैद्यकीय परिषदेतून नऊ सदस्य निवडण्यात येणार, तसेच विविध क्षेत्रांतील अनुभव असलेले तीन सदस्य असतील, याचबरोबर एक अध्यक्ष यांचा समावेश.

सध्याचे अध्यक्ष - डॉ. सुरेशचन्द्र शर्मा (तीन वर्षे कार्यकाल)

आता भारतीय वैद्यक आयोग (Medical Council of India - MCI) ही संस्था रद्दबादल झाली आहे. भारतीय वैद्यकीय परिषद अधिनियम 1956 संपुष्टात येऊन आता राष्ट्रीय वैद्यकीय आयोग अधिनियम 2019 लागू करण्यात करण्यात आला. या सुधारणेमुळे भारतीय वैद्यकीय शिक्षण क्षेत्रात पारदर्शकता येईल आणि दर्जेदार आणि जबाबदार यंत्रणा निर्माण होण्यास मदत होणार आहे. NMC अंतर्गत चार स्वायत्त मंडळेही तयार

केली गेली आहेत, जे राष्ट्रीय आयोगाला कामात मदत करणार आहेत.

1) पदवीपूर्व वैद्यकीय शिक्षण मंडळ

2) पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण मंडळ

3) वैद्यकीय मूल्यांकन आणि मानांकन बोर्ड

4) नीतीशास्त्र आणि वैद्यकीय नोंदणी मंडळ

**राष्ट्रीय वैद्यकीय आयोग कार्य :**

- शिक्षण संस्थांना मानांकन देणे.
- संशोधनावर अधिकाधिक भर देणे.
- शैक्षणिक शुल्क नियमावली प्रसिद्ध करणे.
- परीक्षा पद्धत नियमावली जारी करणे.

---

**जागतिक मलेरिया अहवाल–2020 :**

30 नोव्हेंबर 2020 रोजी जागतिक आरोग्य संघटनेद्वारे हा अहवाल प्रसिद्ध करण्यात आला. जगात मलेरिया रुग्णांची संख्या 229 दशलक्ष इतकी आहे व मागील 4 वर्षांमध्ये या संख्येत फारसा बदल झालेला नाही. 2019 या वर्षात मलेरियामुळे 4,09,000 लोकांचा मृत्यू झाला. 2018 साली मृत्यू संख्या 4,11,000 इतकी होती. या अहवालात मलेरियाच्या रुग्णांची सर्वाधिक संख्या असणारे 11 देश नोंदविण्यात आले आहेत.

---

**गांजा ड्रग्स नव्हे तर औषध :**

2 डिसेंबर 2020 रोजी संयुक्त राष्ट्रसंघाच्या 63 व्या सत्रात गांजाला धोकादायक ड्रग्सच्या यादीतून वगळण्यासंबंधी मतदान झाले.

जागतिक आरोग्य संघटनेकडून करण्यात आलेल्या शिफारशीनंतर ‘संयुक्त राष्ट्राच्या अंमली पदार्थ आयोगाने United Nations Commission on Narcotic Drugs (CND) गांजाला धोकादायक ड्रग्सच्या यादीतून वगळले आहे. यासाठी झालेल्या मतदानात 27 देशांनी गांजाला धोकादायक ड्रग्सच्या यादीतून हटवण्यासाठी समर्थन दिले, तर 25 देशांनी याविरोधात मतदान केले. विशेष म्हणजे यावेळी भारताने गांजाला धोकादायक ड्रग्सच्या यादीतून हटवण्याच्या समर्थनार्थ मतदान केले.

**न्युमोसील लस :**

पुणेस्थित 'सिरम' इन्स्टिट्यूटद्वारे तयार करण्यात आलेल्या 'न्युमोसील' लसीचे 28 डिसेंबर, 2020 रोजी उद्घाटन करण्यात आले. 'न्युमोसील' ही भारताची स्वदेशी निर्मिती असलेली पहिली 'न्युमोकोकल कॉन्ज्युगेट लस' आहे. सिरमची स्थापना 1966 ला सायरस पुनावाला यांनी केली. सिरमचे सध्याचे अध्यक्ष आदर पुनावाला आहेत.

---------------------------------------------

**सुपोषित माँ अभियान :**

1 मार्च 2020 रोजी राजस्थानमधील कोटा येथून लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्या हस्ते 'सुपोषित माँ अभियान'चे उद्घाटन करण्यात आले. कोटा हा ओम बिर्ला यांचा लोकसभा मतदारसंघ आहे. 2022 सालापर्यंत भारतातील कुपोषण निर्मूलनाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी केंद्रीय महिला व कुटुंब कल्याण मंत्रालयाने या अभियानाची अंमलबजावणी सुरु केली आहे. या अभियानाद्वारे देशातील किशोरवयीन मुली आणि गर्भवती महिलांना पोषक आहार पुरवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

---------------------------------------------

**अशा आणखीन महत्वपूर्ण चालू घडामोडीसाठी देवा जाधवर संपादित चालू घडामोडी 57 वी आवृत्ती आवर्जून अभ्यासा. त्याचबरोबर चंद्रकांत गोरे लिखित विज्ञान भाग -1 हे पुस्तक देखील अभ्यासा.**

---------------------------------------------


जनरल नॉलेजसह
चालू घडामोडी
संपादक: देवा जाधवर
उत्तर प्रदेश
• आंतरराष्ट्रीय ते प्रादेशिक घडामोडी आढावा
• केंद्रीय अर्थसंकल्प 2021-22
• आर्थिक पाहणी अहवाल 2020-21
• नागरी पुरस्कार 2021
• सराव प्रश्न स्पष्टीकरणासह
BUDGET 2021
The UNIQUE academy